# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ / वैशाख २३, शके १९४६

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**३५.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने सोमवार, दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४१ निवेदने सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२२ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आाली. एकूण ५७ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०७ निवेदने गुरुवार, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ५० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १० निवेदने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ४० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०७ निवेदने सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक २५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण ३३ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०१ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मे, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

..२/-

**<u>याची प्रत</u> :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

४. अनुवाद कक्ष

५. प्रतिवेदन शाखा

लक्षवेधी सूचना क्र.१५१
२१२.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील मालाड पश्चिम, मालवणी येथील गेट क्र.८, गायकवाडनगर, अंबुजवाडी, दर्शबाग रोड परिसरातील कांदळवणात मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे बांधकामाचा राडारोडा टाकून भराव करणाऱ्या कंत्राटदाराविरोधात पोलीस ठाण्यात दिनांक २५/०१/२०२३ रोजीच्या सुमारास गुन्हा दाखल केल्याची घटना घडणे, सदरहू परिसरात कांदळवणावर भराव टाकून त्यावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात बांधकामे उभी राहत असल्याची धक्कादायक माहिती उघटकीस येणे, तसेच सदरहू अनधिकृत बांधकामामध्ये बांग्लादेश नागरीकही बेकायदा वास्तव्य करीत असल्याचे आढळून येणे, मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाने नेमलेल्या सहायक उपद्रव्य शोधकांनी पाहणी केली असता सदरहू भागात १३ ठिकाणी अशा पध्दतीने राडारोडा व मातीची भरणी टाकून जागा निर्माण करुन त्यावर अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याची माहिती महापालिकेला अधिकृतपणे देण्यात येणे, सदरहू प्रकरणी महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाअंतर्गत संबंधित दोषी कंत्राटदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात येऊनही महापालिका तथा पोलीसांतर्फे सदरहू अनधिकृत बांधकामाविरुध्द अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे आढळून येणे, यामुळे येथील स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबावत शासनाने तातडीने करण्याची कार्यवाही व प्रतिक्रीया."

---

## मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबईतील मालाडा पश्चिम, मालवणी येथील गेट नं.८, गायकवाडनगर, अंबुजवाडी, दर्शनबाग रोड या परिसरातील कांदळवण जमिनीवर भराव टाकला जात असल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/ उत्तर विभागास प्राप्त झाली होती. सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/ उत्तर विभागाने अवैध भरणी करणाऱ्या ६ व्यक्तींवर महाराष्ट्र नगररचना कायदा (एमआरटीपी १९६६) कलम ५२ सह ४३ अंतर्गत मालवणी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच मालवणी पोलीस ठाणे हद्दीतील म्हाडा कॉलनी गेट नं.०१, गायकवाडनगर तसेच सार्वजनिक शौचालयासमोर व म्हाडा कॉलनी गेट नं.८, गायकवाडनगर बस डेपो, मालवणी या ठिकाणी मोकळ्या जागेवर अनधिकृतरित्या रॅबिट व मातीची मोठ्या प्रमाणात भरणी केली जात असल्याने, सदर काम बंद करण्याबाबत महानगरपालिका अधिनियम कलम ३५४(अ) अंतर्गत (१) अ6नस्लम बाबू शेख, (२) इरफान सय्यद व (३) बाबू खान यांना नोटीस बजावल्या होत्या. परंतू संबंधितांनी सदर ठिकाणी भरणीचे काम सुरु ठेवल्याने एमआरटीपी ॲक्ट १९६६ (सुधारित कलम-१९८३) चे उल्लंघन केले म्हणून त्यांच्याविरुध्द एमआरटीपी कायदा, १९६६ (सुधारित कायदा-१९८३) चे कलम ५२, ४३ अन्वये

कायदेशिर कारवाई करण्यात यावी, अशी तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी / उत्तर विभागातील कनिष्ठ अभियंता (इमारत व कारखाने) यांनी दिनांक २४/०१/२०२३ रोजी मालवणी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मालवणी पोलीस ठाणे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२ व ४३ अंतर्गत विशेष गुन्हा (क्र.११४/ २०२३) नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासाचे तसेच साक्षीदार व पुरावे गोळा करण्याचे काम मालवणी पोलीस ठाणे यांच्यामार्फत सुरु आहे. त्याचप्रमाणे संबंधित पोलीस ठाण्यामार्फत या हद्दीत कोंबीग ऑपरेशन राबवून, या तपासणीत मालवणी पोलीसांना बांग्लादेशी नागरीक आढळून आले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, बोरीवली व उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांच्या अहवालानुसार, मालवणी येथील गेट क्र.८ गायकवाडनगर (म्हाडा) येथील मालवणी बस डेपोच्या मागच्या क्षेत्रात १० ते १५ कच्च्या स्वरुपाच्या झोपड्या बांधलेल्या असल्याचे दिसून येत. परंतू सदर ठिकाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या जी.पी.एस. नोंदी नकाशाच्या सहाय्याने सुपर इंम्पोज करुन पाहिले असता सदरचे क्षेत्र अधिसूचित कांदळवनापैकी असल्याचे दिसून आले नाही. तसेच सदरहू क्षेत्राचा स.नं.२६३, न.भू.क्र.३५२५ असा असून सदर मिळकतही महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) ताब्यात असून, सदरचे क्षेत्र कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत येत असल्याचे दिसून आले आहे.

त्याचप्रामणे अंबोजवाडी दर्शनबाग रोड परिसर या ठिकाणी रेविटचा भराव टाकून अंदाजे ३०० ते ४०० कच्च्या/ पक्क्या झोपड्या बांधलेल्या असल्याचे दिसून आले असून या ठिकाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जी.पी.एस. नोंदी नकाशाच्या सहाय्याने सुपर इंम्पोज केले असता, सदरचे क्षेत्र अधिसूचित कांदळवनापैकी असल्याचे दिसून आले नाही. मात्र MRSAC मॅपनुसार सदर क्षेत्र मढ गावचा भाग असल्याचे दिसून आले. या क्षेत्राचा स.नं.२६३, न.भू.क्र.२८४७ व न.भू.क्र.३५५६ असा असून, सदरची मिळकतही महाराष्ट्र शासनाच्या नावे आहे. या मिळकतीचे काही क्षेत्र ५० मीटर कांदळवन क्षेत्रापासून बाहेर तर काही ५० मीटर क्षेत्राच्या आत येत असून सदर मिळकत खाजण असून, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) व महाराष्ट्र शासन अशी धारक सदरी नावे असलेल्या उक्त नमूद दोन्ही मिळकतीचे क्षेत्र कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत येत असल्याचे कांदळवन कक्षाच्या अहवालात नमूद केले आहे.

मौजे मालवणी , स.नं.२६३, न.भू.क्र.२८४१ व न.भू.क्र.३५५६ दर्शनबाग रोड परिसर, अंबोजवाडी, मालवणी, मालाड (प.) येथील महाराष्ट्र शासनाची असून या क्षेत्रावर कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अज्ञात इसमांनी भराव टाकून अंदाजे ३०० ते ४०० कच्च्या / पक्क्या झोपड्या बांधल्या असल्याचे निदर्शनास आल्याने मंडळ अधिकारी, मालवणी यांनी अनोळखी व्यक्तींवर पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९६६ चे कलम १५ (१) (२) अन्वये मालवणी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत तहसिलदार, बोरीवली यांनी प्रभारी उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), मालाड यांना सदर क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कळविले आहे.

एच–०००६–१३अ

D:\2023 लवेसू क्र.2023 सुनिल प्रभू मालाड मालवणी.docx

प्रस्तुत प्रकरणी मंडळ अधिकारी, गोरेगांव, मालवणी व कुरार यांनी केलेल्या संयुक्त स्थळपाहणीत १३ पैकी ५ ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही, परंतू ७ ठिकाणी कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटर आत भराव टाकून बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने मंडळ अधिकारी, मालवणी यांनी मौजे मालवणी म्हाडा कॉलनी गेट नं.८ व गायकवाडनगर येथील म्हाडाच्या मालकीची मिळकत वगळून (१) अमन हॉटेल, एरंगळ, ता. बोरीवली येथील सर्वे नं.१२२/१ व मौजे वळणई, ता. बोरीवली येथील सर्वे नं.३९पै. (न.भू.क्र.१पै) या दोन खाजगी मिळकतीसह खारोडी व्हीलेज, चिकूवाडी, मौजे मालवणी, ता.बोरीवली येथील स.नं.२६५/अ/१, न.भू.क्र.३५३० तसेच बुध्द नगर, मार्वे रोड, न्यु महाकाली नगर, मौजे मालवणी येथील स.नं.२६३, न.भू.क्र.२८४१ येथील जमिनीवर झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ (१) (२) खाली मालवणी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

*******